फोन नं. (02164) 272414, 8275706813
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कराड पिन – ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअक/डिनअॅकेडमिक/२०२४-२०२५/3304 दिनांकः- 20 AUG 2024

## अत्यंत महत्वाची सुचना :-

**विषय :- शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करीता व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष (Sem.- III, V, VII) बी. टेक. अभियांत्रिकी सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेशाबाबत...**

उपरोक्त विषयानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे कामकाज दिनांक १५/०७/२०२४ पासून सुरु झाले असून व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष (Sem.- III, V, VII) बी. टेक. अभियांत्रिकी सर्व अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष प्रवेशाचे कामकाज झालेले आहे. परंतू काही कारणास्तव वरील सत्रांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप प्रत्यक्ष प्रवेश घेतलेला नाही. अशा विद्यार्थ्यांनी **ऑनलाईन पध्दतीने** MIS व्दारे फी भरुन खालील वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावयचा आहे. खालील दर्शविलेल्या दिनांका नंतर प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना रक्कम रुपये १०००/- दंड आकारुनच प्रवेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | वर्ग व शाखा | विद्यार्थी विभागात प्रत्यक्ष येऊन प्रवेश निश्चित करुन प्रवेश अर्ज विद्यार्थी विभागात जमा करावयाचा दिनांक |
|---|---|---|
| १. | व्दितीय वर्ष बी. टेक. सर्व शाखा | २२/०८/२०२४ |
| २. | तृतीय वर्ष बी. टेक. सर्व शाखा | |
| ३. | चतर्थ वर्ष बी. टेक. सर्व शाखा | |

१. तसेच SC, ST, VJNT, SBC & OBC या संवर्गातील विद्यार्थी तसेच EBC सवलतधारक विद्यार्थ्यांनी फी सवलत घेतली असेल अशा वर नमुद केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे महाडिबीटी लॉगीन मधील रिडीम व्हाऊचर यापुर्वी महाडिबीटी संकेतस्थळावर केलेल्या अर्जामधून हार्ड कॉपी प्रिंट सोबत जोडलेल्या (Scholarship No Dues) नमून्यात भरुन प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर महाडिबीटीव्दारे संस्थेच्या हिश्याची रक्कम जमा झालेली असेल अशी सर्व रक्कम शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ चे प्रवेश घेते वेळी एक रक्कमी भरावी. तद्नंतरच पुढील अभ्यासक्रमाचा प्रवेश निश्चित केला जाईल याची नोंद घ्यावी.

३. SC संवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर केंद्र सरकारकडून डीबीटीव्दारे थेट विद्यार्थ्यांचे खातेवर ६० टक्के रक्कम जमा झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी सदरची रक्कम संस्थेस जमा करावी. तसेच यापुर्वी SC संवर्गातील विद्यार्थ्यांनी रक्कम संस्थेच्या खात्यात जमा केली असल्यास त्याची प्रवेश अर्जासोबत पावती जोडणे आवश्यक राहील.

**प्रत्यक्ष प्रवेश अर्ज जमाकरतेवेळी जोडावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे.**

१. सर्व गुणपत्रिका २. जातीचा दाखला ३. जात वैधता प्रमाणपत्र
४. तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला / नॉनक्रिमीलेअर (जे लागू असेल ते) ५. आधार कार्ड
इत्यादीच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित करुन सोबत जोडाव्यात.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या दिनांकास ऑनलाईन पध्दतीने प्रवेश शुल्क जमा करुन विहीत मुदतीत आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत- १.सर्व विभाग प्रमुखांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. तसेच सूचना फलकावर लावणेसाठी.
२.महाविद्यालयाचे वेबसाईटवर प्रदर्शित करणे करीता.